## (१) <u>सर्वसाधारण सूचना</u> -

१.१) परीक्षार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१.२) मागासवर्गीयांकरिता असेलेले शुल्क व प्रवेश पात्रता अटीतील सवलती या केवळ महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्यांसाठी व महाराष्ट्रातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले मागासवर्गीय असल्याचे प्रमाणपत्र असलेल्या परीक्षार्थींसाठी केवळ त्या प्रवर्गापुरत्याच मर्यादित राहतील.

मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या जातीचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र अर्ज पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

**१.३) अपंग परीक्षार्थींसाठी -**

१.३.१) शासन निर्णय क्र. अपंग /१००२/(१५४/०२) असंक दिनांक २३/८/२००५ नुसार अपंग परीक्षार्थींसाठी **शारीरिक पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे राहतील**

- **अल्पदृष्टी (Person with low vision)**

  Means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refractive correction, but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device.

- **कर्णबधिरता (Hearing impairment)**

  Means loss of sixty decibels or more in the better ear in the conversational range of frequencies.

- **अस्थिव्यंग - (Locomotor disability)**

  Means disability of the bones, joints, muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy.

- **अपंग व्यक्ती (Person with disability)**

  Means a person suffering from not less than forty percent of any disability as certified by a medical authority.

१.३.२) अपंगत्वाचा पुरावा - अपंग आरक्षणाचा दावा करणाऱ्या अथवा अपंगांसाठी असलेल्या सुविधेचा (लेखनिकाची मदत) फायदा घेऊ इच्छिणाऱ्या परीक्षार्थींनी सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

१.३.३) अपंग परीक्षार्थींना लेखनिक घ्यावयाचे असल्यास संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक, मुंबई (प., उ., द.) यांचेकडून पूर्व परवानगी घ्यावी व लेखनिकाचे नाव व शैक्षणिक पात्रतेसह मान्यता घ्यावी. [इ. १ ली ते इ. ५ वी करिता (पेपर I) ९ वी वर्गापर्यंत, इ. ६ वी ते इ.८ वी करिता (पेपर II) ११ वी वर्गापर्यंत, सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी लेखनिक म्हणून घेता येतील व त्या शाळेच्या मुख्याध्यापकाचे / प्राचार्याचे बोनाफाईड प्रमाणपत्र व साक्षांकित फोटोसह अर्ज शिक्षणाधिकारी - प्राथमिक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१.३.४) सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेल्या प्रमाणपत्रामध्ये कायमस्वरुपी अपंगत्वाचा उल्लेख असेल व संबंधित नोंदीच्या स्वरुपाविषयी त्यामध्ये स्पष्ट उल्लेख असेल, तर कोणत्याही वर्षातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

१.३.५) शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दि. ६ मे २००४ मधील आदेशानुसार परीक्षार्थी ज्या जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी असेल त्या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील राज्य शासनाने नियुक्त केलेल्या संबंधित विषयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या मंडळाचे अपंगत्वाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र आधारभूत धरण्यात येईल.

१.३.६) परीक्षेसाठी लेखनिक मिळण्याची सुविधा १८/०३/२०१४ च्या GR प्रमाणे राहील.

१.४) परीक्षार्थींना परीक्षेसाठी स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्यासाठी यावे लागेल.

**१.५) प्रत्यक्ष परीक्षा झाल्यानंतर संभाव्य उत्तरसूची एक आठवड्याचे आत जाहीर करण्यात येईल. प्रश्नपत्रिकेमधील प्राप्त आक्षेपांनुसार कोणत्याही कारणामुळे (प्रश्न व पर्यायी उत्तरे) चुकीचे आहेत असे आढळल्यास व परिषदेच्या तज्ज्ञ समितीने तसे मान्य केल्यास, ते प्रश्न रद्द करून उर्वरित प्रश्नांच्या गुणांवर अचूक प्रश्नांनुसार आधारित तज्ज्ञ समितीने निश्चित केलेल्या सूत्रानुसार, पात्रता जाहीर करण्यात येईल.**

१.६) परीक्षा ही मराठी, इंग्रजी व उर्दू या तीन माध्यमातून घेण्यात येईल. परीक्षार्थींना त्यांनी निवडलेल्या माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात येईल. उर्दू माध्यमाच्या परीक्षार्थींना हस्तलिखित स्कॅनिंग केलेल्या प्रश्नपत्रिकेसोबत डी.टी.पी. केलेली प्रश्नपत्रिका देण्यात येईल.

१.७) या संदर्भातील उद्‌भवणारे न्यायालयीन दावे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठ मुंबई, औरंगाबाद व नागपूर न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहतील.

१.८) सदर परीक्षेबाबत शासनस्तरावरून वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस प्राप्त झालेल्या व होणाऱ्या आदेशानुसार व परीक्षा परिषदेच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, ती परीक्षार्थीवर बंधनकारक राहील.